महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

बस स्टँड समोर, धानोरा रोड गडचिरोली पीन- 442 605

दुरध्वनी क्र. 07132- 233015 Email ID : sdogad.gadchiroli@gamil.com

क्रमांक : कार्या/शिरस्तेदार/कावि/९८४ /2023 दिनांक :२९ / 03/2023

## अधिसूचना

**भुमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थपन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 19 (1) खालील अधिसुचना**

ज्याअर्थि, समुचित शासन असलेल्या गडचिरोली जिल्हयाच्या अधिका-याने भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम 11 च्या पोटकलम (1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना क्र. भुसंपादन/ शिरस्तेदार /कावि /169/2023, दिनांक 24 जानेवारी, 2023 अन्वये प्रारंभिक अधिसुचना प्रसिध्द केलेली आहे. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता भुमी संपादनाची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-एक नागपुर विभागीय पुरवणी मध्ये दिनांक 2 ते 8 फेब्रुवारी, 2023 या दिनांकावर प्रसिध्द करण्यात आली. तसेच सांध्य दैनिक वृत्तपत्र (मराठी) गडचिरोली पत्रीका मध्ये दिनांक 28 जानेवारी, 2023 व दैनिक वृत्तपत्र (मराठी) महासागर मध्ये दिनांक 28 जानेवारी, 2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसुचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसुची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसुची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि, ज्याअर्थी गडचिरोली जिल्हाधिकारी यांनी, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्यांची खात्री पटली आहे. आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि, ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.(संपादन होणाऱ्या जमिनीवर कोणाचेही पुर्नवसन होणार नाही. त्यामुळे सदर मुद्याची माहिती निरंक आहे.)

आणि, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांना पदनिर्देशीत केले आहे.

विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गडचिरोली
सत्यमेव जयते

## अनुसुची I

### संपादित करावयाच्या जमीनीचे वर्णन

गावाचे नाव :- अडपल्ली, ता. जि. गडचिरोली त.सा.क्र. 04

| अ.क्र | सर्व्हे क्र. | एकुण क्षेत्र (हे. आर.) | संपादित करावयाचे क्षेत्र (हे. आर.) | जमिनीचा भोगवटा वर्ग | भुधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 238 | 1.05 | 1.05 | 1 | दिवाकर मोतीराम राऊत व इतर 7 |
| 2 | 152/1 | 1.39 | 1.39 | 1 | लिलाबाई भोजु पाल व इतर 10 |
| 3 | 256/3 | 1.20 | 1.20 | 2 | रमेश जोगा वनकर व इतर 3 |
| एकूण | | | 3.64 हे.आर. | | |

## अनुसुची II

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव :- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता जमिन भुसंपादन.

प्रकल्पाचे कामाचे विवरण :- विद्यापीठाचे शैक्षणिक व भौतिक विकासाकरीता.

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे :- जिल्हयातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता लाभ होणार आहे.

## अनुसुची III

### पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन

प्रकल्प बाधितांना विस्थापीत करणे :- प्रकल्पाने भुधारक विस्थपित होत नाही.

आवश्यक असल्याबाबतची कारणे निरंक

## अनुसुची IV

### पुर्नवसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार -अ महसुल व वन विभाग दिनांक 07 आक्टोंबर, 2022 अन्वये सामाजीक आघात निर्धारणापासुन सुट देण्यात आलेली आहे.

## अनुसुची V

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ. अधिका-याचे नाव पदनाम :- विषेश भुसंपादन अधिकारी तथा सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गडचिरोली.

ब. अधिका-याचा कार्यालयीन पत्ता :- बस स्टॅन्ड समोर, धानोरा रोड, गडचिरोली ता.जि.गडचिरोली.

क. ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसुचनेचे विस्तृत विवरण :- निरंक

संपादनामुळे भुधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुर्नवसन अधिनियम 1986 व तदनंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

ठिकाण :- गडचिरोली

दिनांक :-29 /03/2023

विशेष भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गडचिरोली ★ सत्यमेव जयते

(डॉ. मैनक घोष,भा.प्र.से.)
विशेष भुसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, गडचिरोली